गुरुवार दि. १० सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक १० वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## धान्याच्या काळाबाजाराविरोधात संयुक्त कारवाई

# १५७ क्विंटल धान्य जप्त

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यात धान्याचा काळाबाजार व अवैध साठवणुकीला आळा घालण्यासाठी जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनाच्या संयुक्त पथकाने जालना तालुक्यातील चंदनझिरा येथे छापा टाकून १५७.४० क्विंटल धान्य जप्त केले. या कारवाईत अनधिकृतरीत्या साठवून ठेवलेला तांदूळ, ज्वारी व वाटाणा आढळून आला.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू आणि जिल्हा पुरवठा अधिकारी शशिकांत हदगल यांच्या निर्देशानुसार धान्याचा काळाबाजार रोखण्यासाठी विशेष संयुक्त तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून गोपनीय माहितीच्या आधारे चंदनझिरा येथे ही कारवाई करण्यात आली.



सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी ज्ञानेश्वर दिवटे, नायब तहसीलदार एस. आर. तायडे, पुरवठा निरीक्षण अधिकारी महेश थेरे, सहायक महसूल अधिकारी देवानंद डोईफोडे तसेच पोलीस कर्मचारी व्ही. एस. बहुरे, पुंगळे आणि ए. बी. चव्हाण यांच्या संयुक्त पथकाने छापा टाकला.

तपासणीदरम्यान संबंधित ठिकाणी धान्याची साठवणूक, खरेदी-विक्री आणि वाहतुकीसंदर्भातील आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे आढळून आले. तसेच साठा नोंदवही, विक्री नोंदी आणि इतर आवश्यक अभिलेखही आढळले नाहीत. पथकाने पंचनामा करून १५७.४० क्विंटल धान्य जप्त केले असून पुढील कार्यवाही सुरू केली आहे.

या प्रकरणी संबंधितांविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समितीची बैठक संपन्न

*केंद्र व राज्य शासनाच्या विविध विकास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीचा आढावा; प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश*

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यात केंद्र व राज्य शासनाच्या विविध विकास योजनांची प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी करून त्याचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती (दिशा समिती)ची बैठक आज जिल्हा नियोजन सभागृहात येथे संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी खासदार डॉ. कल्याण काळे होते. यावेळी जिल्ह्यात सुरू असलेल्या विविध विकासकामांचा, योजनांच्या प्रगतीचा तसेच प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.




यावेळी बैठकीस आमदार हिकमत उढाण (घनसावंगी), विधान परिषद सदस्य सुहास सिरसाट, जिल्हाधिकारी तथा समितीच्या सदस्य सचिव आशिमा मित्तल, नगराध्यक्ष मिर्झा समरिन नाज, वसीम बेग, दिशा समिती सदस्य राधाकिसन तेजराव भोसले, रतन गोविंदा सोनवणे, सुनील चिंतामण तुरेराव, शिल्पा प्रदीप इंगळे यांच्यासह जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारीया, जालना महानगर पालिका आयुक्त अंजली शर्मा, प्रकल्प संचालक सुनीलकुमार पठारे, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीच्या प्रारंभी दि. १५ सप्टेंबर २०२५ रोजी रोजी झालेल्यास दिशा समितीच्या बैठकीतील निर्णय व सूचनांवर झालेल्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (एमआरईजीएस), कृषी विभाग, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, राष्ट्रीय सामाजिक सहायता कार्यक्रम, ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद), प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, पीक विमा योजना आदी विविध योजनांच्या जिल्ह्यातील अंमलबजावणीची माहिती संबंधित विभागांकडून घेण्यात आली.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, प्रग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, घरकुल, स्वच्छता, रोजगार निर्मिती आणि कृषीविषयक योजनांना अधिक गती देण्याची आवश्यकता असल्याचे बैठकीत नमूद करण्यात आले. पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळण्यात कोणत्याही प्रकारचा विलंब होऊ नये, यासाठी विभागांनी परस्पर समन्वयाने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

जिल्ह्यातील विविध विभागांकडून सुरू असलेल्या विकासकामांची सद्यस्थिती जाणून घेताना (पान २ वर)



शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी बाजीउमरद येथे बैलपोळा सणाच्या पुर्वसंध्येला खांदे मळणी निमित्ताने बैलांची विधीवत पुजा केली

## जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल राहुल लोणीकर यांचा पालम येथे सत्कार

**परतूर - प्रतिनिधी**

जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी राहुल लोणीकर यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल आज पालम जी परभणी येथे त्यांचा सत्कार करण्यात आला. सहकार क्षेत्रातील महत्त्वाच्या जबाबदारीवर त्यांची बिनविरोध निवड झाल्याने पालम परिसरातील पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी आनंद व्यक्त करत राहुल लोणीकर यांचे अभिनंदन केले. राहुल लोणीकर हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, राजकीय



व संघटनात्मक क्षेत्रात सक्रिय असून त्यांच्या नेतृत्वाची राज्यभरात स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे. संघटन कौशल्य, कार्यकर्त्यांशी असलेला सातत्यपूर्ण संवाद आणि विविध विकासकामांसाठी पाठपुरावा करण्याची त्यांची कार्यपद्धती यामुळे त्यांचे नेतृत्व सर्वश्रुत झाले आहे. विविध स्तरांवरील पदाधिकाऱ्यांशी समन्वय साधत संघटना मजबूत करण्यासाठी त्यांनी केलेले कार्य त्यांच्या नेतृत्वाची व्यापकता अधोरेखित करणारे आहे. जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड होणे ही राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वावर आणि कार्यक्षमतेवर व्यक्त झालेला विश्वास मानला जात आहे. सहकार क्षेत्रात शेतकरी, सभासद आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला केंद्रस्थानी ठेवून काम करण्याची मोठी जबाबदारी आता त्यांच्या खांद्यावर आली आहे. (पान २ वर)

## त्रुटींची पूर्तता होताच परवाना निलंबन त्वरित मागे घ्या; मुंबई उच्च न्यायालयाचे एफडीएला कडक ताशेरे

**मुंबई - प्रतिनिधी**

अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) दाखवून दिलेल्या त्रुटींची पूर्तता संबंधित आस्थापनेने केल्यानंतर आणि ऑटो-जनरेटेड अहवालात नियमांचे पालन झाल्याचे स्पष्ट झाल्यावर प्राधिकरणाने परवाना निलंबन किंवा रद्दचा आदेश त्वरित मागे घेतलाच पाहिजे, असा महत्त्वपूर्ण आणि कडक निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. अशा प्रकरणांमध्ये व्यावसायिकांना न्यायालयात धाव घेण्यास भाग पाडू नका, असे निर्देश देत उच्च न्यायालयाने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. सध्याच्या गणेशोत्सवाच्या धामधुमीत दुग्धजन्य पदार्थ व खाद्यपदार्थांची मागणी शिखरावर असताना आलेला हा निकाल संपूर्ण अन्न व्यवसायासाठी ( ) मोठा दिलासा आणि वरदान मानला जात आहे. प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अनखाड यांच्या खंडपीठाने सिद्धार्थ अ‍ॅग्रो वि. महाराष्ट्र शासन (रिट याचिका क्र. ९९४६/२०२६) ( ९९४६ २०२६) या याचिकेवर सुनावणी करताना हा निकाल दिला. त्रुटींची पूर्तता करूनही निलंबन मागे न घेतल्यामुळे व्यवसायांचे मोठे आर्थिक नुकसान होते आणि त्याचा कामगारांसह पुरवठा साखळीवर विपरीत परिणाम होतो. ज्या आदेशाचे अस्तित्वच संपले आहे, तो रद्द करून घेण्यासाठी आस्थापनांना उच्च न्यायालयाचे उंबरठे झिजवायला लावणे अनाठायी असून यामुळे न्यायालयावरही खटल्यांचा विनाकारण बोजा पडतो, असे ताशेरे खंडपीठाने ओढले. हे प्रकरण दूध संकलन व पुरवठा करणाऱ्या सिद्धार्थ अ‍ॅग्रो या आस्थापनेशी संबंधित होते, ज्यांचे परवाना निलंबन त्रुटींची पूर्तता केल्यानंतरही मागे घेण्यात आले नव्हते. न्यायालयाने या प्रकरणात पुन्हा तपासणी (पान २ वर)

## जेईएस लोककला विभागाची जिल्हास्तरीय युवक महोत्सवात बाजी

### समूह, सुगम गायन आणि शास्त्रीय तालवाद्य वादनात प्रथम क्रमांक

**जालना - प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अंतर्गत नुकत्याच पार पडलेल्या जालना जिल्हास्तरीय युवक महोत्सवात येथील जेईएस महाविद्यालयाच्या लोककला विभागाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या महोत्सवात विद्यार्थ्यांनी समूह गायन, सुगम गायन आणि शास्त्रीय तालवाद्य वादनात प्रथम, तर चित्रकला स्पर्धेत




द्वितीय क्रमांक मिळवला आहे. लाल बहादूर शास्त्री वरिष्ठ महाविद्यालय (परतूर) आणि स्वामी विवेकानंद महाविद्यालय (मंठा) यांच्या संयुक्त विद्यमाने ७ व ८ सप्टेंबर रोजी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. महोत्सवातील समूह गायन स्पर्धेत जेईएसच्या विद्यार्थ्यांनी लोककला विभागाचे प्रा. कल्याण उगले लिखित 'स्वातंत्र्य झाली भारतमाता' हे देशभक्तीपर गीत व 'अश्वारूढ देव' हे गीत प्रभावीपणे सादर केले. सोहेब शेख, काजल आव्हाड, आनंद घुले, रोशनी पारवे आणि आदित्य मुदिराज यांच्या सादरीकरणाने सभागृहात देशभक्तीची भावना जागृत केली व (पान २ वर)

### जालना भाजपा नगरसेवकांचे मुंबईत प्रशिक्षण शिबिर संपन्न

## प्रशिक्षणातून जनसेवा अधिक प्रभावी करण्यास मदत होईल - भास्कर दानवे

**जालना - प्रतिनिधी**

पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६ अंतर्गत जालना महानगरपालिका क्षेत्रातील भाजपा नगरसेवकांचे दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, मुंबई येथे दि. ८ ते ९ सप्टेंबर २०२६ रोजी संपन्न झाले. भाजपा परिवाराची विचारधारा, पक्षाची संघटनात्मक भूमिका तसेच जनसेवेचे कार्य अधिक प्रभावीपणे समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी नगरसेवकांना विविध विषयांवर या प्रशिक्षण शिबिरात



मार्गदर्शन करण्यात आले. लोकप्रतिनिधींनी नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवून त्यांच्या समस्या समजून घेत प्रभावीपणे सोडविण्याच्या दृष्टीने प्रशिक्षणामध्ये विविध विषयांची माहिती देण्यात आली. या प्रशिक्षण शिबिराचे उदघाटन राष्ट्रीय महामंत्री तथा महाराष्ट्र प्रभारी शिवप्रकाश यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाजपा प्रदेश महामंत्री राजेश पांडे, सुनील राणे, ना.आशीष शेलार, आ.अतुल भातकळकर, नितीन काळे, अभिराम घड्याळ पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रशिक्षण शिबिराचा समारोप ना.अतुलजी सावे यांच्या उपस्थितीत झाला. या प्रशिक्षण शिबिरातील माझा प्रभाग, आदर्श प्रभाग सूक्ष्म नियोजन, जनसहभाग आणि शाश्वत नागरी विकास' या सत्राच्या अध्यक्षस्थानी भाजपा जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक भास्कर आबा दानवे होते. या सत्रात प्रभागाचा नियोजनबद्ध व सर्वांगीण विकास करण्यासाठी विश्लेषण, ५ वर्षांचा प्रभाग विकास आराखडा ( ) आणि इन्फ्रास्ट्रक्चर ऑडिट याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच 'झिरो वेस्ट प्रभाग' संकल्पनेद्वारे स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि नागरिकांचा सहभाग वाढविण्यावर भर देण्यात (पान २ वर)

## 'नवकार महामंत्र मंत्राधिराज, पर्युषण पर्वाधिराज'

### अंतगड सूत्रवाचनातून आत्मशुद्धी, कर्मनिर्जरा व आत्मपरीक्षणाचा संदेश

**जालना । प्रतिनिधी**

पर्वाधिराज पर्युषण पर्वाच्या दुसऱ्या दिवशी श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाच्या वतीने गणेश नगर येथील 'पावन तपोधाम' व गुरू गणेश दरबारात धार्मिक कार्यक्रम भक्तिभावात पार पडले. भगवान महावीर स्वामींची स्तुती, नवकार महामंत्राचे स्मरण, मंगलाचरण आणि अंतगड सूत्रवाचनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी प्रवचनातून पर्युषण म्हणजे बाह्य जगापासून अंतरंगाकडे वळण्याचे, आत्मपरीक्षण करण्याचे आणि कर्मनिर्जरा साधण्याचे पर्व असल्याचा संदेश देण्यात आला. अंतगड सूत्राला आत्मशुद्धीचा 'महायज्ञ' मानून क्रोध, मान, माया, लोभ, राग-द्वेष यांसारख्या दुर्गुणांची आहुती देण्याचे आवाहन करण्यात आले. प्रवचनात 'मंत्राधिराज, तीर्थाधिराज आणि पर्वाधिराज' या तीन संकल्पनांचा आध्यात्मिक अर्थ स्पष्ट करण्यात आला. नवकार महामंत्र हा 'मंत्राधिराज' असून त्यात पंचपरमेष्ठींचे वंदन केले जाते. मंत्राचा केवळ उच्चार न करता श्रद्धा आणि भावनेने त्याची आराधना करणे महत्त्वाचे असल्याचे सांगण्यात आले. साधू, साध्वी, श्रावक आणि श्राविका या चतुर्विध संघाच्या माध्यमातून 'तीर्थ' संकल्पना स्पष्ट करताना तीर्थ म्हणजे संसारसागरातून पार जाण्याचा मार्ग असल्याचे सांगण्यात आले. तर पर्युषण हे आत्मा, आत्मोन्नती, आत्मपरीक्षण आणि कर्मनिर्जरेवर केंद्रित असल्याने 'पर्वाधिराज' असल्याचे प्रवचनातून स्पष्ट करण्यात आले. अंतगड सूत्राच्या पुढील कथाभागात जंबूस्वामी आणि सुधर्मा स्वामी यांच्या ज्ञानपरंपरेचा (पान २ वर)

# संपादकीय...

## आपली मुले

आशय-वीणा सानेकर आम्हा सर्व मित्र-मैत्रिणींची मुलं तेव्हा लहान होती. आई-बाबा म्हणून आम्ही चुकत माकत घडत होतो आणि आमची मुलेही घडत होती. एकदा उदय नावाच्या आमच्या मित्राने त्याला आवडलेल्या एका पुस्तकाचा उल्लेख केला. हे पुस्तक म्हणजे डॉ. विजया वाड यांचे आपली मुलं!२००१ साली प्रकाशित झालेले हे पुस्तक. होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राचे निवृत्त संचालक वि. गो. कुलकर्णी यांनी या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत अत्यंत स्पष्ट विधान केले आहे. ते म्हणतात,''शाळा हे मुलांचे बालपण गाडून टाकणारे ठिकाण आहे काय? या पुस्तकाच्या अनुक्रमणिकेवरून नजर फिरवताना अतिशय महत्त्वाचे विषय समोर येत गेले. 'घरचं वातावरण,' 'एकुलतं एक,' 'शिक्षा आणि पारितोषिक,' 'प्रगतिपुस्तक', 'संस्कार', 'आत्महत्येपासून दूर', 'पालक? नव्हे मालक!', या काही विषयांवरून नजर जरी फिरवली तरी हे पुस्तक अनेक अंगांनी पालकांशी हितगुज करते.

मुलगा आणि मुलगी यांच्यात वेगवेगळ्या घरांमध्ये केला जाणारा भेद दाखवणारा 'भेदाभेद अमंगळ' हा लेख या पुस्तकात आहे. स्वयं निर्णयाची ताकद पालकांनीच मुलींमध्ये निर्माण करायला हवी, हे विविध अनुभवांमधून विजया बाईंनी मांडले आहे. बाईंच्या वर्गातली एक मुलगी हुंड्याच्या विषयावरच्या निबंधात लिहिते, की मी हुंडाबळी होण्याचा प्रश्नच येत नाही कारण माझे लग्नच होणार नाही. मुलीचे रूप, तिचा रंग या गोष्टींना समाज किती महत्त्व देतो हे सांगताना बाई एखाद्या रंगाने काळ्या रूपवान नसणे मुलीच्या आईलाच तिची लाज वाटते हे अनुभवाद्वारा व्यक्त करतात.मुलांच्या निकोप वाढीसाठी घरातले वातावरण पूरक असावे लागते, हे सांगताना वाडबाई लिहितात, '' ज्या घरात मोठी जागा आहे पण मनात जागा नाही, त्या घरांना घरपण कुठलं ? मुलं शोधत असतात मनातली जागा! ''शाळांतून लैंगिक शिक्षण देणे का गरजेचे आहे आणि नकळत्या वयात केवळ मुले चोरटेपणाने त्यांचे कुतूहल शमवतात आणि यातून गुन्हे घडतात, हे सांगणारा लेख आवर्जून समजून घ्यावा असा आहे.

'पौगंडावस्थेतील आपला मुलगा किंवा मुलगी सुरवंटाच्या अवस्थेत असते. त्यांच्याशी सहज संवाद साधा. या नात्यातला विश्वास आणि मोकळेपणा म्हणजे विकासाची मनमोकळी संधी !'पालक नव्हे मालक ! 'या लेखाचा शेवट कायम माझ्या स्मरणात राहिलेला आहे. ''कुठेच डेड एंड नसतो. एका रस्त्याला दुसरा रस्ता फुटतो.''शिक्षक आणि प्राचार्य म्हणून वाड बाईंचा अनुभव प्रदीर्घ आहे. या दीर्घ प्रवासातील प्रसंग प्रत्यक्षात आसपास घडलेले आहेत. या अनुभवांच्या कथा पुस्तकात बोलक्या होतात. जीवन चार गुणांपुरते मर्यादित नाही. एखाद्या जवळ असलेली माणुसकी लाख मोलाची असते' हे काही विद्यार्थी त्यांच्या वागण्यातून पटवून देतात.मुलांवर कोणतीही लेबले न लावता, ती आहेत तसे त्यांना स्वीकारणे गरजेचे असते.या पुस्तकात शाळेतले, घरातले, समाजातले अनेक अनुभव शब्दबद्ध झालेले आहेत. अतिशय सहज सुंदर संवादात्मक भाषा हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य. कथन करण्याच्या प्रभावी शैलीमुळे हे अनुभव वाचकाच्या मनाला भिडतात. आपल्या अवतीभवती कुठे ही घडू शकतील असे हे अनुभव आपल्या मुलांना वाढवताना सर्व पालकांना उपयुक्त ठरतील यात शंका नाही.शहरातल्या बऱ्याच घरातले पालक आज अर्थार्जनासाठी बाहेर पडतात. श्रीमंत असो वा गरीब प्रत्येक घरात वेगवेगळ्या परिस्थितीत मुले वाढत असतात आणि आहे त्या परिस्थितीत त्यांच्या वाढीसाठी योग्य वातावरण देणे हे त्यांच्या समोरचे मोठे आव्हान आहे. आज त्रिकोणी कुटुंबात तर ते अधिक आहे. अशावेळी आपली मुलं मौल्यवान असल्यामुळे त्यांना जपण्यासाठी 'आपली मुलं 'सारखे एखादे पुस्तक हाती हवेच कारण जन्म दिला म्हणून पालक हे मुलांचे मालक ठरत नाहीत. त्यांची भूमिका झाडांची काळजी घेणाऱ्या माळ्याची असायला हवी तरच प्रत्येक मूल स्वतःच्या सुगंधासह बहरते.



## अत्यंत प्रेरणादायी ''पंख जिद्दीचे'' प्रकाशित

स्टेट बँकेत सफाई कामगार ते असिस्टंट जनरल मॅनेजर पदापर्यंत मजल मारणाऱ्या प्रतिक्षा तोंडवळकर यांचे ''पंख जिद्दीचे'' हे आत्मकथन नुकतेच

अतिशय उत्साही वातावरणात स्टेट बँकेच्या निवृत्त अधिकारी नैना पानसे, चित्रकार शेखर साने, श्री संभाजी कोंडे महाराज, स्टेट बँकेचे निवृत्त जनरल मॅनेजर चंद्रशेखर पोवार आदींच्या हस्ते पुण्यात प्रकाशित झाले. या आत्मकथनाचे शब्दांकन चारुशीला बिवरे यांनी तर संपादनश्री देवेंद्र भुजबळ यांनी केले असून न्यूज स्टोरी टुडेने प्रकाशन केले आहे. चारुशीला बिवरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.त्यानंतर प्रतिक्षाताईंच्या बँकेतील सहकाऱ्यांनी त्यांच्याविषयी अनेक आठवणी व प्रसंग सांगितले.तर पुस्तकातील काही भागांचे प्रभावी अभिवाचन चारुशीला बिवरे व अर्चना अंबासकर यांनी केले. कार्यक्रमाचे निवेदन श्री विनायक तोंडवळकर यांनी अतिशय समर्थपणे केले.

या हृद कार्यक्रमास आवर्जून उपस्थित असलेल्या प्रतिक्षाताईंच्या आईवडिलांचे आनंदाश्रू व त्यांना मुलीबद्दल वाटत असलेला अभिमान क्षणोक्षणी दिसून येत होता. घरातील सर्व सदस्यही यावेळी उपस्थित होते. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. पुस्तक प्रकाशनाचा हा कार्यक्रम अत्यन्त सुंदर, भावपूर्ण व प्रेरणादायी झाला.

# शर्यत अजून संपलेली नाही

आज महिलांनी शिक्षण, उद्योग, प्रशासन आणि विज्ञान अशा प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवली. तरीही सर्वोच्च नेतृत्वाच्या पदांपर्यंत पोहोचताना अद्यापही अनेक अदृश्य अडथळे उभे राहतात. संधीची समानता, गुणवत्तेचा सन्मान आणि निर्णय घेणाऱ्यांची मानसिकता या तीन गोष्टींची खरी परीक्षा याच टप्प्यावर होते. माजी पेप्सीको अध्यक्षा इंद्रा नूयी यांच्या अलीकडील वक्तव्याने हा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आणला. महिलांना संधी मिळवण्यासाठी अजूनही लढावंच लागतं? या प्रश्नाचं उत्तर शोधताना सुधा मूर्ती यांच्या आयुष्यातील एक प्रसंग आपल्याला सांगून जातो की, शर्यत महिलांच्या क्षमतेची नसून त्यांना समान संधी देणाऱ्या समाजाच्या मानसिकतेची आहे आणि ती शर्यत अजून संपलेली नाही.

माजी पेप्सीको अध्यक्षा इंद्रा नूयी यांनी अमेरिकेतील एका कार्यक्रमात माजी अमेरिकन परराष्ट्रमंत्री कॉन्डोलीझ्झा रईस यांच्याशी संवाद साधताना असे वक्तव्य केले की, ''मी अमेरिकेबाहेरील कोणत्याही देशात, भारतातसुद्धा, सीईओ होऊ शकले नसते. कारण अमेरिकेची व्यवस्था गुणवत्तेला प्राधान्य देते. येथे मार्गदर्शक तुम्ही पुरुष आहात की महिला, तुमची जात, वंश किंवा पार्श्वभूमी काय आहे, यापेक्षा तुमच्यातील गुणवत्ता आणि क्षमता महत्त्वाची मानतात.'' या वक्तव्यानंतर भारतात मोठी चर्चा रंगली. काहींनी नूयी यांच्या मताशी सहमती दर्शवत भारतात अजूनही महिलांना सर्वोच्च नेतृत्वापर्यंत पोहोचताना अनेक संरचनात्मक अडथळ्यांना सामोरं जावं लागतं, असे म्हटले, तर अनेकांनी त्यांच्या विधानावर टीका करत भारतातील कॉर्पोरेट क्षेत्रात महिलांसाठी वाढलेल्या संधींकडे त्यांनी दुर्लक्ष केल्याचे मत व्यक्त केले. दुसरी गोष्ट भारतात जिथे महिला काम करतात तिथले वरिष्ठ महिलांविषयी काय विचार करतात किंवा त्यांचं मत काय असू शकतं हे देखील महत्त्वाचे आहे. या एकूणच पार्श्वभूमीवर मला एक किस्सा आठवतो. महिलांना समान संधी मिळायला हव्यात, याचे सर्वात प्रभावी उदाहरण म्हणजे सुधा मूर्ती यांचा टेल्को अर्थात टाटामधील प्रवेश. हा प्रसंग आजही खासगी कंपनीतील महिलांच्या सक्षमीकरणाचा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. सुधा मूर्ती यांनी एका मुलाखतीत सांगितलेला हा किस्सा. टेल्कोने अभियंत्यांच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. मात्र, त्या जाहिरातीच्या शेवटी 'महिला उमेदवारांनी अर्ज करू नये' अशी अट नमूद करण्यात आली होती. ही जाहिरात पाहिल्यानंतर सुधा मूर्ती यांनी थेट टाटा समूहाचे तत्कालीन अध्यक्ष जे. आर. डी. टाटा यांना पत्र लिहिलं. त्या पत्रात त्यांनी स्पष्टपणे नमूद केलं की, ''देशातील जवळपास ५० टक्के लोकसंख्या महिलांची असताना, केवळ लिंगाच्या आधारावर त्यांना नोकरीपासून दूर ठेवणे योग्य नाही.'' हे पत्र वाचल्यानंतर जे. आर. डी. टाटा यांनी त्यांना मुलाखतीसाठी बोलावलं. मुलाखतीदरम्यान त्यांनी सांगितलं की, ही नियुक्ती जमशेदपूर येथे होती. त्या काळी तेथे बहुतांश कर्मचारी पुरुष होते आणि महिलांसाठी आवश्यक निवास व इतर सुविधा पुरेशा उपलब्ध नव्हत्या, त्यामुळेच ही अट जाहिरातीत टाकण्यात आली होती. मात्र, सुधा मूर्ती यांनी कोणतीही भीती न बाळगता ही नोकरी स्वीकारण्याची तयारी दर्शवली. त्या वेळी त्यांना अमेरिकेत पीएच.डी.साठी जाण्याची संधीही होती. तरीही त्यांनी टेल्कोमध्ये रुजू होण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयामुळे टेल्कोमध्ये महिला अभियंत्यांसाठी दारे खुली झाली आणि पुढील अनेक महिलांना अभियांत्रिकी क्षेत्रात संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. अमेरिकेनं मला जी संधी दिली ती मला भारतातही मिळाली नसती यावर नूयी यांच्याशी कोणी सहमत आहे, तर कोणी सहमत नाही. पण ज्यावेळी एखादी महिला मग ती त्या पदास लायक असेल, तर तिला त्या पदावर सन्मानानं विराजमान करणारी मानसिकता तिथे जिवंत असणंही तितकंच महत्त्वाचं आहे. सूधा मूर्ती या आपल्या कंपनीत रुजू होण्यास सक्षम आहेत मात्र त्यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने टाटा यांनी अधिक विचार केला. ही वैचारिक पातळी आज किती कंपन्यांमधील वरिष्ठांमध्ये असेल. महिला सक्षमच आहेत पण त्याची जाणीव प्रत्येक क्षेत्रातील पुरुषालाही असायला हवी. अर्थात आज नूयी यांनी मांडलेला मुद्दा चुकीचा नाही. महिलांचे नेतृत्व, शिक्षण आणि करिअरविषयी आणि त्यांच्या पदाविषयी बोलायचे तर टॉप-५०० कंपन्यांमध्ये केवळ ०.४ टक्के महिला सीईओ असल्याचे समोर आलंय. या पार्श्वभूमीवर सुधा मूर्ती यांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. त्यांच्या मते, महिलांना शिक्षण, कौशल्यविकास आणि करिअरमध्ये पुरुषांप्रमाणे समान संधी मिळाल्या पाहिजेत. मात्र, केवळ महिला असल्यामुळे कोणालाही पद मिळू नये हे मान्य नाही. नेतृत्वाच्या संधी पात्रता, मेहनत आणि गुणवत्तेच्या आधारावर मिळायला हव्यात. आर्थिक स्वातंत्र्यामुळे आज महिलांचा आत्मविश्वास वाढला आणि नेतृत्वाच्या संधीही विस्तारत आहेत. पण हे देखील इतकच खरं की कुटुंबातील जबाबदाऱ्या, सामाजिक अपेक्षा आणि कार्यस्थळावरील अडचणी यामुळे अनेक महिला करिअरच्या मधल्या टप्प्यात मागे पडतात, याकडेही आपण लक्ष वेधायला हवं. कंपन्यांनी महिलांना टिकून राहता येईल, प्रगती करता येईल आणि नेतृत्वाच्या भूमिका स्वीकारता येतील, असे सकारात्मक आणि समावेशक कार्यपरिसर निर्माण करणे गरजेचे आहे. नूयी यांच्या वक्तव्यानंतर भारतीय कॉर्पोरेट क्षेत्रात लिंगवैविध्य आणि महिलांच्या नेतृत्वाचा मुद्दा केंद्रस्थानी आला. बोर्डरूममध्ये महिलांचे प्रतिनिधित्व वाढल्याचे चित्र दिसत असले, तरी सर्वोच्च निर्णयक्षम पदांवर महिलांची उपस्थिती अत्यंत कमी असल्याचे समोर आले. ही परिस्थिती दर्शवते की महिलांना बोर्डमध्ये स्थान मिळत असले, तरी सर्वोच्च नेतृत्वापर्यंत पोहोचण्याचा त्यांचा प्रवास अजूनही कठीण आहे. भारतातील कॉर्पोरेट क्षेत्रात महिलांच्या प्रतिनिधित्वावर नव्याने चर्चा सुरू झाली. भारतात अनेक यशस्वी महिला उद्योगनेत्या घडल्या असल्या, तरी त्या अपवादात्मक उदाहरणे असल्याचे वास्तव आकडेवारी स्पष्ट करते. फॉर्च्यून कंपन्यांच्या आढाव्यातून स्पष्ट झाले, की देशातील जवळपास निम्मी लोकसंख्या महिला असतानाही नेतृत्वाच्या सर्वोच्च पदांवर त्यांचे प्रतिनिधित्व अत्यंत कमी आहे. कंपनी कायदा २०१३ अंतर्गत प्रत्येक पात्र कंपनीने किमान एक महिला स्वतंत्र संचालक नियुक्त करणे बंधनकारक करण्यात आले. या निर्णयाचा सकारात्मक परिणाम दिसून आला. सीएफए इन्स्टिट्यूट इंडियाच्या माहितीनुसार बोर्डवरील महिलांचे प्रतिनिधित्व सुमारे १९ टक्क्यांपर्यंत पोहोचले. मात्र, या क्षेत्रात अजूनही मोठी दरी आहे. ४१ कंपन्यांमध्ये अजूनही एकही महिला स्वतंत्र संचालक नाही. २१६ कंपन्यांमध्ये केवळ नियमापुरती एक महिला संचालक आहे. तज्ज्ञांच्या मते, मुख्य समस्या बोर्डरूममध्ये नसून मध्यम आणि वरिष्ठ व्यवस्थापनाच्या स्तरावर आहे. महिलांना करिअरमध्ये टिकून राहण्यासाठी, नेतृत्व विकसित करण्यासाठी आणि समान संधी मिळण्यासाठी संस्थात्मक पातळीवर सक्षम धोरणे राबविणे अधिक आवश्यक आहे. माजी नेस्ले इंडिया व्यवस्थापकीय संचालक सुरेश नारायणन यांच्या मते, केवळ कोट्यावर आधारित नियुक्त्यांपेक्षा गुणवत्तेवर निवड प्रक्रियेला प्राधान्य दिले पाहिजे. कंपन्यांनी अशी कार्यसंस्कृती निर्माण करणे गरजेचे आहे, जिथे महिलांना नेतृत्वाच्या संधी नैसर्गिकरीत्या उपलब्ध होतील. कॉर्पोरेट भारताने बोर्डरूममध्ये महिलांसाठी दारे उघडली असली, तरी सीईओ आणि एमडीसारख्या सर्वोच्च पदांपर्यंत महिलांची संख्या वाढविण्यासाठी अजून मोठा पल्ला गाठायचा आहे.

## पान १ व ४ वरुन...

### जिल्हा विकास...

ज्या कामांना प्रशासकीय, तांत्रिक किंवा अन्य कारणांमुळे विलंब होत आहे, त्या कामांचा स्वतंत्रपणे आढावा घेण्यात आला. संबंधित अधिकाऱ्यांनी प्रलंबित कामांची कारणे स्पष्ट करून ती कामे निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश यावेळी समिती अध्यक्ष डॉ. काळे यांनी दिले.

विकासकामांची गुणवत्ता आणि वेळेत पूर्तता याकडे विशेष लक्ष देण्याबरोबरच कामांच्या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थिती तपासण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. शासनाच्या निधीचा योग्य आणि परिणामकारक वापर होऊन नागरिकांना त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळणे आवश्यक असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा उद्देश समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाचा लाभ पोहोचविणे हा आहे. त्यामुळे केवळ योजनांची कागदोपत्री अंमलबजावणी न करता प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचतो आहे की नाही, याची विभागांनी नियमितपणे तपासणी करावी, असे निर्देश बैठकीत देण्यात आले.

लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक मजबूत करून जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यावरही यावेळी भर देण्यात आला. नागरिकांच्या तक्रारी आणि स्थानिक पातळीवरील अडचणींचे तातडीने निराकरण करण्यासाठी संबंधित विभागांनी संवेदनशीलतेने काम करावे, असे आवाहन करण्यात आले.

बैठकीच्या शेवटी विविध विभागांनी घेतलेल्या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करून त्याचा अहवाल वेळेत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. बैठकीस उपस्थित सर्व लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी समन्वयाने काम करण्याची ग्वाही दिली.

### जालना जिल्हा...

बँकेच्या माध्यमातून शेतकरी व ग्रामीण भागातील नागरिकांना अधिक सक्षम आर्थिक सुविधा मिळाव्यात, सहकार चळवळीला बळ मिळावे आणि संस्थेच्या कामकाजाला अधिक गतिमान दिशा मिळावी, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

याप्रसंगी परभणी जिल्हा परिषदेचे सदस्य गणेशरावजी रोकडे यांच्या उपस्थितीत रामरावजी रोकडे, लक्ष्मणरावजी रोकडे, गुलाबराव रोकडे, गोविंद रोकडे, गोपाळ रोकडे, सचिन रोकडे, कन्हैया रोकडे, अमोल रोकडे, माऊली रोकडे, प्रकाश रोकडे आणि वैभव रोकडे यांनी राहुल लोणीकर यांचा सत्कार करून त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थितांनी राहुल लोणीकर यांच्या अध्यक्षपदाच्या कारकिर्दीसाठी शुभेच्छा व्यक्त करत त्यांच्या नेतृत्वाखाली जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कामकाजाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. शेतकरी, सभासद आणि सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी बँकेच्या माध्यमातून प्रभावी काम उभे राहील, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली. राजकीय व सामाजिक क्षेत्रासोबतच सहकार क्षेत्रातील ही नवी जबाबदारी राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वाचा विस्तार करणारी ठरणार असून, त्यांच्या बिनविरोध निवडीचे विविध स्तरांतून स्वागत होत आहे.

### त्रुटींची पूर्तता...

करून नियमांचे पालन आढळल्यास निलंबन तातडीने मागे घेण्याचे आदेश दिले आहेत. याचिकेत याचिकाकर्त्यांतर्फे अ‍ॅड. मनोज बडगुजर तर शासनातर्फे अतिरिक्त सरकारी वकील प्रियभूषण काकडे आणि पूजा पाटील यांनी बाजू मांडली.

उच्च न्यायालयाच्या या महत्त्वपूर्ण निर्णयाचे स्वागत करताना अ‍ॅड. महेश धन्नावत यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त केली: ''मुंबई उच्च न्यायालयाचा हा निकाल अन्न व औषध नियमन क्षेत्रातील प्रामाणिक व्यावसायिकांसाठी अत्यंत दिलासादायक आणि ऐतिहासिक आहे. एफडीएच्या दिरंगाईमुळे किंवा हेतुपुरस्सर दुर्लक्षामुळे त्रुटींची पूर्तता करूनही व्यवसाय ठप्प राहतात, ज्यामुळे उद्योजकांना कोट्यवधींचा फटका बसत होता. त्रुटी दूर झाल्यावर यंत्रणेने केवळ कागदी घोडे न नाचवता तातडीने निलंबन मागे घेणे कायद्याने बंधनकारक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केल्याने प्रशासकीय मनमानीला मोठा चाप बसेल आणि इज ऑफ डुईंग बिझनेसला खऱ्या अर्थाने बळ मिळेल.

### जेईएस लोककला...

स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. सुगम गायन स्पर्धेत प्रा. उगले लिखित 'मन मंदिरात माझ्या' या भक्तीगीताचे केवळ एकतारी आणि दिमडीच्या साथीने सादरीकरण करण्यात आले. या सादरीकरणाला उपस्थितांची दाद मिळाली आणि या प्रकारातही महाविद्यालयाने प्रथम क्रमांक प्राप्त केला. शास्त्रीय तालवाद्य वादन (पखवाज) प्रकारात अर्जुन धुमाळ या विद्यार्थ्याने आपल्या शास्त्रोक्त पखवाज वादनातून प्रथम क्रमांक मिळवला. तसेच, चित्रकला स्पर्धेत वैष्णवी गोशिक हिने आपल्या चित्रातील कल्पकता आणि आशयघन कलात्मक मांडणीतून द्वितीय क्रमांक प्राप्त केला. या विद्यार्थ्यांना लोककला विभागप्रमुख प्रा. कल्याण उगले यांचे मार्गदर्शन लाभले. महोत्सवात संघाचे प्रमुख म्हणून डॉ. प्रा. मनोज महेर आणि डॉ. अमोल खांडेभराड यांनी जबाबदारी पार पाडली. जिल्हा पातळीवरील या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तमजी बगडिया, सचिव श्रीनिवासजी भक्कड, जेईएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, मराठी विभागप्रमुख डॉ. यशवंत सोनुने सर्व प्राध्यापक वृंदांकडून विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

### प्रशिक्षणातून...

आला. नियोजन आणि जनसहभागातून आदर्श व शाश्वत प्रभाग निर्माण करण्याचा संदेश या सत्रातून देण्यात आला.

यावेळी भास्कर आबा दानवे म्हणाले की, पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६ अंतर्गत महानगरपालिका नगरसेवकांसाठी आयोजित प्रशिक्षणातून लोकप्रतिनिधींना राजकीय, प्रशासकीय, कायदेशीर तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रभावी प्रशिक्षण मिळाले. महानगरपालिका कामकाजाचे नियम, अर्थसंकल्प व निधी नियोजन, प्रभाग विकास आराखडा, जनसहभाग, सोशल मीडिया तसेच तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणामुळे नगरसेवकांची कार्यक्षमता वाढून नागरिकांच्या समस्या अधिक प्रभावीपणे सोडविण्यास मदत होईल. माझा प्रभाग आदर्श प्रभाग या संकल्पनेतून विकासाभिमुख आणि जनतेशी थेट संवाद साधणारे लोकप्रतिनिधी घडविणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. भाजपा संघटन अधिक सक्षम करून विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्राच्या संकल्पनेला स्थानिक पातळीवर गती देण्यासाठी हे प्रशिक्षण निश्चितच महत्त्वपूर्ण ठरेल,'' असे मत भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी व्यक्त केले.

या प्रशिक्षण शिबिरास जालना येथून भाजपा जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक भास्कर आबा दानवे यांच्यासह माजी आ.कैलासजी गोरंटयाल, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, नगरसेवक संगिताताई गोरंट्याल, महावीर ढक्का, अक्षय गोरंट्याल, सुशीलाताई दानवे, संध्या देठे, रमेश गोरक्षक, कल्याण भदनेकर, पदमा मानधानी, अ‍ॅड. भगवान चांदोडे, कपिल भरेवाल, सकुबाई पानबिसरे, संजय पाखरे, वीरेंद्र धोका, संतोष माधोवाले, वर्षा राऊत, मंगल गरदास, महेश निकम, शशिकांत घुगे, अशोक पवार, सिद्धिविनायक मुळे, अर्जुन गेही, शोभा नारियलवाले आणि आनंद झारकंडे सहभागी झाले होते.

### 'नवकार महामंत्र ...

संदर्भ देत आध्यात्मिक ज्ञानामुळे जिज्ञासा कमी न होता अधिक वाढत जाते, असा संदेश देण्यात आला. तसेच द्वारिका नगरी, कृष्ण वासुदेव आणि अंधकवृष्णी यांच्या संदर्भातील कथाभाग पुढे नेण्यात आला. पर्युषण काळात जिनवाणीचे श्रवण, नवकार महामंत्राची आराधना, तप, संयम, क्षमा आणि आत्मचिंतन यांना महत्त्व देऊन प्रत्येकाने धर्म केवळ ऐकण्यापुरता न ठेवता आचरणात आणावा, असे आवाहन करण्यात आले.

### स्वामी प्रियाशरणजी...

संतोष बगडिया, ज्योती अग्रवाल, शीतल धानवाला, कोमल अग्रवाल, मीना अग्रवाल

रीता भरतीया, रश्मी बगडिया, प्रीती अग्रवाल लीला निमोदिया, चंचल अग्रवाल, प्रियंका कामड,दीपिका देवीदान आदींनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाची सांगता महाआरती आणि महाप्रसादाने झाली.

अग्रवाल महासभेतर्फे श्रावण महिन्यानिमित्त कावड यात्राही काढण्यात आली होती. त्यात महिला पुरुष व बालकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

### मराठवाड्यात ३...

सुरू करण्यात आली असून, यासंदर्भातील अर्जांबाबत महाधिवक्त्यांचे कायदेशीर मत घेण्यात येणार आहे. तसेच सातारा आणि कोल्हापूर गॅझेटियर लागू करण्याबाबत शासनाने सकारात्मक भूमिका घेतली असल्याचे मंत्री डॉ. सामंत यांनी स्पष्ट केले. मराठा समाजाला न्याय देताना संविधानिक व न्यायिक चौकटीत राहून आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी शासन पूर्णपणे सकारात्मक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील शासन मराठा समाजाला कायदेशीर आणि टिकणारे आरक्षण मिळवून देण्यासाठी कटिबद्ध आहे. त्याचवेळी इतर मागासवर्गीय समाजाच्या आरक्षणाला किंवा त्यांच्या हक्कांना कोणताही धक्का लागू नये, याचीही शासनाकडून पूर्ण दक्षता घेतली जात असल्याचे मंत्री डॉ. सामंत यांनी सांगितले. प्रशासकीय यंत्रणेकडून सुरू असलेली कार्यवाही, उपलब्ध करून देण्यात आलेल्या नोंदी, प्रमाणपत्रांचे वाटप आणि जात पडताळणीची प्रकरणे याबाबतची माहिती संबंधित घटकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. शासनाची ही कार्यवाही अधिक गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना सातत्याने करण्यात येत असल्याचेही मंत्री डॉ. सामंत यांनी स्पष्ट केले.

### रेशीम शेतीतून...

मिळविणारे अकोला निकळक येथील प्रगतिशील रेशीम उत्पादक अशोक सानप तसेच नजीक पांगरी येथील विठोबा वाघ यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. या प्रगतिशील शेतकऱ्यांनी रेशीम शेतीतील आपल्या यशस्वी अनुभवांची माहिती उपस्थित शेतकऱ्यांना दिली. रेशीम शेती हा शाश्वत व फायदेशीर उत्पन्नाचा पर्याय असल्याचे सांगत त्यांनी नवीन शेतकऱ्यांना रेशीम उद्योग स्वीकारण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी गावचे सरपंच महादु आबाजी गिते यांनी शेतकऱ्यांना सातत्याने तांत्रिक मार्गदर्शन व सहकार्य केल्याबद्दल संबंधित अधिकारी व संस्थांचे आभार मानले. आगामी काळात गावातील तुती लागवडीखालील क्षेत्र वाढवून अधिकाधिक शेतकऱ्यांना रेशीम उद्योगाशी जोडण्यासाठी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रेशीम कार्यालयाचे कर्मचारी डॉ. गोविंद गीते यांनी परिश्रम घेतले.

### परतूर विधानसभा...

उत्पादनातील घट आणि शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती याबाबत सविस्तर माहिती देऊन शासनाने तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर शासनस्तरावर तातडीने पाठपुरावा करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील,

अशी भूमिका नितिन जेथलिया यांनी यावेळी व्यक्त केली. ''परतूर विधानसभा मतदारसंघातील शेतकरी आज मोठ्या संकटातून जात आहेत. पावसाच्या दीर्घ खंडामुळे कापूस, सोयाबीन व इतर खरीप पिकांचे मोठे नुकसान होत आहे. शेतकऱ्यांना वेळेत मदत मिळाली नाही तर त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट ओढवेल. त्यामुळे तात्काळ पंचनामे, पीकविमा नुकसानभरपाई, शासकीय नुकसानभरपाई आणि पूर्वीचे ०४ ट्रिगर पुन्हा लागू करण्यासाठी शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी आमची मागणी आहे,'' असे नितिन सुरेशकुमार जेथलिया यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या या गंभीर प्रश्नाची शासनाने तातडीने दखल घेऊन परतूर विधानसभा मतदारसंघातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय व आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# ११ सप्टेंबर ऐतिहासिक बडग्या-मारबत उत्सव

नागपूरातील मारबत उत्सव ही देशाच्या इतिहासातील मोठी आणि ऐतिहासिक परंपरा आहे.याच उद्देशाने नागपूरच्या १४६ वर्षांचा मारबत-बडग्या उत्सव आता आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याची तयारी नागपूर महानगरपालिकेने केली आहे.याकरीता मनपाने या उत्सवासाठी दोन कोटी रुपयांची तरतूद केली आहे ही ऐतिहासिक दृष्ट्या नागपूरकरांसाठी गौरवाची गोष्ट आहे. मारबत उत्सवाची सुरूवात इंग्रजांच्या काळात सुरू करण्यात आली.यामागचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना एकत्रित करून इंग्रजांविरूध्द मोठा लढा उभा करणे. कालांतराने हा उत्सव समाजातील वाईट चालीरितीचा व वाईट रूढींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे या सणाचे उद्दीष्ट ठरले.येणारे विघ्न दुर करण्यासाठी १८८० मध्ये काळ्या मारबतीची सुरूवात झाली.यानंतर १८८४मध्ये पिवळ्या मारबतीची सुरूवात झाली.आज काळ्या मारबतीला १४६ वर्षे पूर्ण होत आहे तर पिवळ्या मारबतीला १४२ वर्षे पूर्ण होत आहे हा एक इतिहासच म्हणावा लागेल. दोन्ही मारबती मांडण्या मागचा एकच उद्देश होता आणि आहे तो म्हणजे येणारे विघ्न, रोगराई, महागाई, दुष्काळ,भ्रष्टाचार दूर व्हावा.नागपूरसाठी आश्चर्याची गोष्ट म्हणजे आजही १४६वर्षे जुनी परंपरा त्याच पद्धतीने पारपाडल्या जाते. हा नागपूरच्या इतिहासातीलच नाही तर भारतीय इतिहासातील परंपरेची मोठी धरोहर व संस्कृतीच म्हणावी लागेल.कारण या उत्सवात संपूर्ण धर्माचे लोक मोठ्या आनंदाने सहभागी होतात.त्यामुळे ही नागपुरकरांसाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे.त्याहीवेळेस मारबतीची सलग आठ दिवस पुजा-अर्चना व्हायची आणि आताही होते.त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात सांस्कृतिक कार्यक्रम सुध्दा होतात.असेही सांगण्यात येते की मारबत ही नवसाला पावणारी असल्याची अनेकांची श्रद्धा आहे. मारबतीच्या दर्शनासाठी अनेकजन नवजात शिशूचे तोंड मारबतीच्या




स्तनाला लावण्याची देखील प्रथा आहे.त्यामुळे काळ्या मारबतीचा व पिवळ्या मारबतीला पारंपरिक पद्धतीने महत्त्व दील्या जाते.मारबतीचा सन पोळ्याच्या पाडव्याला म्हणजे तान्हया पोळ्याच्या दिवशी भव्य मिरवणूक काढुन येणाऱ्या विघ्नांच्या व विघटनकारी शक्तीच्या विरोधात जय घोष करून ''ईडा-पीडा,माशा-मुरकुट्या, रोगराईला घेऊन जा गे मारबत'' अशा घोषणांनी केल्या जाते व संपूर्ण शहरातील नागरिक यात सहभागी होवून संपूर्ण नागपूर दुमदुमते.मोठ्या पोळ्याच्या दिवशी म्हणजेच अमावस्येला घरोघरी मेड्यांच्या (पळसाचे) फांद्यांची पुजा केली जाते व दुसऱ्या दिवशी पाडव्याला चौका-चौकामध्ये पळसाच्या फांद्यांचे दहन केले जाते व घोषणा केली जाते ''माशा-मुरकुट्या,रोगराईला घेऊन जा गे मारबत''अशा घोषणा केल्या जातात.माझ्यामते सायंटिफिक दृष्ट्या किंवा सामाजिक दृष्ट्या पळसाच्या पानांच्या धुर अवश्य जंतुनाशकाचे कार्य करीत असावे यात दुमत नाही. कालांतराने या दिवसाला एवढे महत्त्व आले की भ्रष्ट व कलंकित राजनेता किंवा भ्रष्टाचारी यांच्या विरोधात त्याची प्रतीकृती काढून ''बडगा'' काढून निषेध केला जातो.त्याच प्रमाणे महागाई,अत्याचार, आतंकवाद, महामारी, बँक घोटाळे इत्यादींच्या विरोधात बडग्याच्या रूपात प्रतीकृती काढून निषेध नोंदविला जातो.त्याचप्रमाणे यावर्षी पेपर फुटीच्या संदर्भात सुद्धा बडग्या निघेल.यात अनेक सामाजिक संघटना (मंडळ) मोठ्या प्रमाणात सहभागी होतात.पिवळ्या व काळ्या मारबतीच्या रूपाने आज अनेक विघटनकारी शक्तीचा, अत्याचाराचा विरोध करून समाजात जनजागृती करण्याची काळ्या व पिवळ्या मारबतीपासुनच परंपरा मिळाली आहे असे मी समजतो.कारण यामुळे समाजात राजकीय पुढारी, अत्याचारी,भ्रष्टाचारी कोणते घृणास्पद कार्य करतात हे संपूर्ण उघडपणे बडग्याच्या रूपात आपल्याला व देशाला पहायला मिळते व यामुळे समाजात जनजागृती निर्माण होत असते. म्हणजेच मारबत हा सन समाज जागृतीचा मोठा दिवस असल्याचे मी समजतो.कारण यामुळे राजकीय पुढाऱ्यांची मोठ्या प्रमाणात पोल-खोल होत असते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे १८९७ मध्ये प्लेगची साथ आली होती.त्यानंतर १९२८मध्ये नागपूरात इंग्रजांनी हिंदू-मुस्लिम दंगली घडविल्या तरीही संपूर्ण धर्माच्या समाजबंधवांनी मारबत उत्सवाला कुठेही तडा जाऊ दिली नाही ही नागपूरसाठी व देशासाठी स्वाभिमानाची बाब आहे.त्यामुळे या दोन्ही वर्षी मारबत उत्सवात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण झाला नाही. परंतु करोना महामारीच्या काळात पहिल्यांदाच मारबत उत्सवातील मिरवणुकीत विग्घ निर्माण केले.परंतु करोना महामारी संपुष्टात आल्यानंतर देशातील संपूर्ण धर्माचे सण मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरे व्हायला लागले. मुख्यत्वे करून समाजातील वाईट गोष्टींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे मारबत उत्सव या सणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. मारबत उत्सवात बडग्यांची भुमिका मोलाची असते कारण बडगे हे देशातील विघातक गोष्टींचा निषेध नोंदविनारे असतात. यावर्षी मिरवणुकीत आपल्याला अनेक बडगे पहायला मिळेल यात महागाई, सिलेंडरची दरवाढ,पेट्रोल दरवाढ,शहरातील खड्डे,पाकिस्तान,चीन, आतंवाद, घोटाळेबाज, भ्रष्टाचारी, अत्याचारी,बेरोजगारी आणि आता पेपर फुटी इत्यादी घटनेच्या विरोधात शंभरहून अधिक बडगे यावर्षी आपल्याला पहायला मिळु शकते.मारबत उत्सवाची सुरूवात नागपूर मधुन झाली.परंतु आता मारबत उत्सव महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात साजरा केल्या जातो.आज मारबत उत्सवाच्या निमित्ताने देशात होणारे अत्याचार, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, महागाई,वाढता भ्रष्टाचार यांचा विरोधात समाजाने एकत्रित येण्याच्या उद्देशाने देशातील अनेक राज्यांनी नागपुरची परंपरा अंगीकारून समाजात सर्वसामान्यांवर होणारा अत्याचार देशातील१४५ कोटी जनतेने उघड्या डोळ्यांनी पाहावा या उद्देशाने मारबत उत्सवाच्या दिवशी प्रतिकात्मक पुतळ्याचे बडगे काढून विरोध प्रगट केल्या जातो.यामुळे सुध्दा समाजात जनजागृती होतांना आपण पहातो.देशातील भ्रष्टाचाऱ्यांनी देशाला इतके पोखरून टाकले आहे की इंग्रजांनी देशाला लुटले खरे,परंतु देशातील भ्रष्ट नेत्यांनी देशाला हजार पटीने लुटले आहे.यांच्यामुळे देशात महागाईचा, बेरोजगारीचा व शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा डोंगर उभा झाला आहे.याचे प्रायश्चित्त देशातील १४५ कोटी जनता भोगत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे व गरीबांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे.त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांना घेऊन जा गे मारबत!



**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९**

# ग्रामीण उत्पादनांना डिजिटल बाजारपेठेची नवी संधी

**जालना - प्रतिनिधी**

ग्रामीण भागात तयार होणारे पारंपरिक खाद्यपदार्थ, घरगुती उत्पादने, सेंद्रिय वस्तू आणि स्थानिक कौशल्याला मोठी मागणी असतानाही योग्य बाजारपेठ, ब्रँडिंग आणि आधुनिक ॅकेजिंगअभावी अनेक उत्पादकांना अपेक्षित बाजारपेठ मिळत नाही.ही अडचण दूर करण्यासाठी 'गावाकडचं.कॉम' या डिजिटल व्यासपीठाची सुरुवात करण्यात आली आहे.ग्रामीण उत्पादनांना थेट आधुनिक ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमाचा प्रयत्न आहे.

'गावाकडचं.कॉम' हे केवळ ऑनलाइन खरेदी-विक्रीचे व्यासपीठ नसून महिला बचत गट, शेतकरी, घरगुती उत्पादक, लघुउद्योजक आणि पारंपरिक पदार्थ तयार करणाऱ्या कारागिरांना डिजिटल बाजारपेठेशी जोडणारे माध्यम म्हणून विकसित करण्यात आले आहे. गावातील उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देतानाच गुणवत्ता, पॅकेजिंग, ब्रँडिंग, डिजिटल मार्केटिंग आणि ऑनलाइन विक्रीची प्रक्रिया सुलभ करण्यावर भर देण्यात येत आहे. या माध्यमातून घरगुती पद्धतीने तयार केलेली लोणची, पापड, चटण्या, विविध प्रकारची तयार पिठे, पारंपरिक महाराष्ट्रीय खाद्यपदार्थ तसेच नैसर्गिक आणि सेंद्रिय उत्पादनांना ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील उत्पादकांना स्थानिक बाजारपेठेच्या पलीकडे जाऊन मोठ्या ग्राहकवर्गापर्यंत पोहोचण्याची संधी मिळणार आहे. ग्रामीण महिलांना व्यवसायाची नवी दिशा ग्रामीण भागातील अनेक महिला बचत गट व महिला घरगुती स्तरावर विविध उत्पादने तयार करतात. मात्र, उत्पादनाची विक्री, जाहिरात आणि ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची व्यवस्था नसल्याने त्यांचा व्यवसाय मर्यादित राहतो. 'गावाकडचं.कॉम'च्या माध्यमातून अशा महिलांना आपल्या उत्पादनांना डिजिटल ओळख देऊन व्यापक बाजारपेठेत विक्री करण्याची संधी मिळणार आहे.

'आजच्या काळात ग्राहकांना शुद्ध, नैसर्गिक आणि पारंपरिक उत्पादनांची गरज वाढत आहे. मात्र ग्रामीण उत्पादकांना मोठ्या बाजारपेठेपर्यंत पोहोचण्याची सुविधा, डिजिटल विक्रीचे ज्ञान आणि ब्रँडिंगचा अभाव आहे. ही दरी दूर करण्यासाठी 'गावाकडचं.कॉम' दुवा म्हणून काम करणार आहे. प्रत्येक गावातील गुणवत्तापूर्ण उत्पादनाला डिजिटल ओळख मिळावी, हे आमचे ध्येय आहे,' असे संस्थापकांनी सांगितले.

# प्रवासातील देवदूत दिपाली पंडित

सोमवारी, रत्नागिरी - सावंतवाडी एस टी बसने राजापूरहून ८.१५ वाजता सुटणारी बस मधून कणकवली प्रांत कार्यालयातील तहसीलदार श्रीमती दिपाली पंडित साप्ताहिक सुट्टी संपवून प्रवास करीत होत्या.गाडीत प्रवाशांची गर्दी होती.मागच्या बाजूकडून नांदगाव बस थांब्याजवळ आवाज आला आई आपल्या मुलीला अगं उठ,उठना असं म्हणत हताश झाली होती.गालावर थोपटत होती.आधी वाटले मुलगी गाढ झोपेत आहे.पुढे हुंबरट थांब्या दरम्यान गाडी आली वाहकाच्या चेहऱ्यावर चिंता दिसून आली ते सारखे मागे पुढे जात होते.त्यांच्याकडे चौकशी केली असता समजले मुलगी बेशुद्ध पडली आहे.त्यांनी वेळेचे प्रसंगावधान ओळखून मुलीच्या आसनाकडे धाव घेतली.मुलीची मुर्चितावस्था पाहून तिला आसनावर आडवे केले आणि तातडीने सीपीआर देण्याची क्रिया सुरू केली.छातीवर दाब येताच पाचव्यांदा दिलेल्या दाबाला मुलीने प्रतिसाद दिला.मुलगी शुद्धीवर आलेली पाहून आईसह बसमधील प्रवाशांनी निःश्वास सोडला.गाडीचे वाहक - चालक निश्चिंत झाले.हुंबरट येथे जवळपास असलेल्या रुग्णांलयात पुढील उपचारासाठी आई मुलीला घेऊन गेली.दिपाली पंडित नायब तहसीलदार यांच्या समाजसेवीवृत्तीची , कर्तव्यदक्ष अधिकार्यांची प्रशंसा प्रवाशी करीत असताना देवदूताच्या रूपाने पंडित धावून आल्याची चर्चा कणकवली आगारात लागल्यासारखी पसरली.पंडित यांच्या तत्परतेचे कौतुक सर्व स्तरातून होत आहे.



**महादेव गोळवसकर**
**राजापूर**
**९८६९४७६२०९**

# कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रांसाठी जालना जिल्ह्यात विशेष शिबिरे

## १० ते १६ सप्टेंबरदरम्यान जिल्ह्यातील सर्व ६२ महसूल मंडळांत आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील नागरिकांना कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र तसेच जात पडताळणी प्रमाणपत्र सुलभ, पारदर्शक आणि जलदगतीने मिळावे, यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत विशेष उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्याअंतर्गत दि. १० ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील सर्व ६२ महसूल मंडळांमध्ये विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यात आढळून आलेल्या कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी नोंदी तसेच नोंदींच्या याद्या आतापर्यंत ४८ ग्रामपंचायत कार्यालयांच्या सूचना फलकांवर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. उर्वरित ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये नोंदी प्रसिद्ध करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यामुळे ग्रामस्थांना त्यांच्या नोंदी सहजपणे पाहता येणार असून, प्रमाणपत्रासाठी आवश्यक पुराव्यांची पूर्वकल्पना मिळण्यास मदत होणार आहे.

**६२ महसूल मंडळामध्ये विशेष शिबिराचे आयोजन**

नागरिकांना कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्याच्य अनुषगांने कार्यवाही गतिमान करण्यासाठी १० ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत मंडळस्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या विशेष शिबिरांमध्ये जुन्या महसूल नोंदी व पुरावे शोधणे, नागरिकांकडून प्राप्त अर्ज व कागदपत्रांची तातडीने पडताळणी करणे आणि पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वितरण करणे, ही प्रमुख उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत. जिल्ह्यातील ६२ महसूल मंडळामध्ये हे शिबिर होणार आहेत. या प्रक्रियेत नागरिकांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करून कामकाज गतिमान व पारदर्शक करण्यासाठी उपजिल्हाधिकारी (निवडणूक शाखा) शिरीष यादव यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. नोडल अधिकारी दररोज तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जात प्रमाणपत्र पडताळणी समितीशी समन्वय साधून प्रलंबित अर्जांचा तातडीने निपटारा करणार आहेत.

जिल्ह्यात ५ हजार २७ नोंदी जालना जिल्ह्यात आढळून आलेल्या कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा अशा एकूण ५ हजार २७ नोंदी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात जात प्रमाणपत्रासाठी एकूण १८ हजार २९५ अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी १८ हजार २७६ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. कागदपत्रांतील त्रुटींमुळे १९ अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत. दि. ८ सप्टेंबर २०२६ अखेर संबंधित कार्यालयांकडे प्रमाणपत्रासाठी एकही अर्ज प्रलंबित नाही. हैदराबाद गॅझेटवर आधारित अर्जांवरही शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

दि. २ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार प्राप्त झालेल्या ४२१ अर्जांपैकी ३७७ अर्ज मंजूर करण्यात आले असल्याचे जिल्हा प्रशासनाने नमूद केले आहे.

# गणेशोत्सव भक्तीचा, सामाजिक बांधिलकीचा आणि विधायक कार्याचा असावा

लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला व्यापक आणि सामाजिक स्वरूप देऊन आज सुमारे १३३ वर्षे झाली आहेत. भारतीय समाजाला एका व्यासपीठावर आणणे, लोकांमध्ये एकोपा निर्माण करणे, तरुणांना संघटित करणे आणि त्यांच्यामध्ये राष्ट्रप्रेमाची भावना जागृत करणे, या व्यापक उद्देशाने लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला सुरुवात केली. ब्रिटिश राजवटीत भारतीयांवर अनेक प्रकारचे निर्बंध होते. समाजातील विविध घटकांमध्ये एकजूट निर्माण करून स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी जनजागृती करणे आवश्यक होते. ही गरज ओळखून टिळकांनी धार्मिक उत्सवाला सामाजिक आणि राष्ट्रीय चळवळीचे स्वरूप दिले. त्यामुळे सार्वजनिक गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव न राहता समाजजागृतीचे प्रभावी माध्यम बनला. हळूहळू सार्वजनिक गणेशोत्सव महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग बनला. आज महाराष्ट्रातच नव्हे, तर देशाच्या विविध भागांत मोठ्या उत्साहाने गणेशोत्सव साजरा केला जातो. गणरायाच्या आगमनापासून ते विसर्जनापर्यंत सर्वत्र भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण असते. घरोघरी गणेशाची प्रतिष्ठापना केली जाते. सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. गणेशभक्त मोठ्या श्रद्धेने गणरायाची पूजा-अर्चा करतात. त्यामुळे गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत या उत्सवाच्या स्वरूपात काही चिंताजनक बदल झाले आहेत. लोकमान्य टिळकांनी ज्या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला होता, त्या उद्देशापासून आपण दूर तर जात नाही ना, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. भक्तीपेक्षा दिखावा, सामाजिक बांधिलकीपेक्षा स्पर्धा आणि साधेपणापेक्षा भपका यांना अधिक महत्त्व मिळू लागल्याचे चित्र काही ठिकाणी दिसते. गणेशोत्सव हा उत्सव न राहता काही ठिकाणी जणू 'इव्हेंट' बनत चालला आहे, ही बाब निश्चितच चिंताजनक आहे. गणेशोत्सवात उंचच उंच मूर्ती बसविण्याची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. मोठी मूर्ती म्हणजे मोठी प्रतिष्ठा, असा गैरसमज निर्माण होत आहे. मूर्तीचा आकार वाढत जातो; मात्र भक्तीची उंची त्याबरोबर वाढतेच असे नाही. मोठ्या मूर्तींची प्रतिष्ठापना आणि विसर्जन करताना अनेक अडचणी निर्माण होतात. त्यामुळे गणेशमूर्तीच्या आकारापेक्षा तिच्यामागील श्रद्धा, संस्कार आणि सामाजिक संदेश महत्त्वाचा आहे. अनावश्यक मोठ्या मूर्तींचे प्रदर्शन करण्यापेक्षा पर्यावरणपूरक आणि सुबक गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करणे अधिक योग्य ठरेल.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव ही आजची खरी गरज आहे. शाडूच्या मातीपासून बनविलेल्या गणेशमूर्तींना प्राधान्य दिले पाहिजे. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती पाण्यात सहज विरघळत नसल्यामुळे विसर्जनानंतर जलप्रदूषणाची समस्या निर्माण होऊ शकते. नदी, तलाव आणि समुद्र हे आपल्या पर्यावरणाचे महत्त्वाचे घटक आहेत. गणरायाचे विसर्जन करताना या जलस्रोतांचे प्रदूषण होणार नाही, याची काळजी घेणे ही प्रत्येक गणेशभक्ताची जबाबदारी आहे. कृत्रिम विसर्जन तलावांचा वापर, शाडूच्या मातीच्या मूर्ती आणि पर्यावरणपूरक सजावट यांचा स्वीकार करून गणेशोत्सव अधिक निसर्गस्नेही करता येईल.

गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत ध्वनीप्रदूषणाचा प्रश्नही गंभीर बनतो. मोठ्या आवाजातील ध्वनिवर्धक, डीजे आणि कर्णकर्कश संगीतामुळे परिसरातील नागरिकांना त्रास होतो. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, रुग्ण तसेच परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना या ध्वनीप्रदूषणाचा मोठा त्रास सहन करावा लागू शकतो. उत्सवाचा आनंद घेताना इतरांच्या शांततेचा आणि आरोग्याचा विचार करणे आवश्यक आहे. धार्मिक उत्सवाच्या नावाखाली ध्वनीची मर्यादा ओलांडणे योग्य नाही. भक्ती ही मोठ्या आवाजात नव्हे, तर मनापासून केली जाते. वर्गणी हा देखील गणेशोत्सवातील महत्त्वाचा प्रश्न आहे. गणेश मंडळांनी नागरिकांकडून स्वेच्छेने मिळणारी वर्गणी स्वीकारावी. वर्गणीसाठी कोणावरही दबाव आणणे किंवा धमकी देणे चुकीचे आहे. नागरिकांनी दिलेल्या पैशांचा योग्य आणि पारदर्शक वापर झाला पाहिजे. मंडळांनी जमा झालेली वर्गणी आणि झालेला खर्च याचा हिशेब नागरिकांसमोर मांडला तर गणेश मंडळांवरील विश्वास अधिक दृढ होईल. गणेशोत्सवाच्या नावाखाली आर्थिक गैरप्रकार होऊ नयेत, यासाठी पारदर्शकता अत्यंत आवश्यक आहे.

गणेशोत्सवातील अनावश्यक रोषणाई आणि भव्य सजावट यावरही विचार करण्याची गरज आहे. आकर्षक सजावट करण्याच्या स्पर्धेत मोठ्या प्रमाणावर वीज खर्च केली जाते. सजावट साधी, सुंदर आणि पर्यावरणपूरक असली तरी उत्सवाचे सौंदर्य कमी होत नाही. उलट साधेपणातही सौंदर्य आणि संस्कार दडलेले असतात. विजेची बचत करून तो पैसा समाजोपयोगी कामांसाठी वापरला तर गणेशोत्सवाचा सामाजिक अर्थ अधिक व्यापक होईल. काही ठिकाणी गणेश मंडळांमध्ये 'आमचा गणपती मोठा', 'आमची सजावट मोठी', 'आमचा कार्यक्रम मोठा' अशी स्पर्धा निर्माण होते. मंडळांचे मार्केटिंग करण्यासाठी जाहिराती, अनावश्यक प्रसिद्धी आणि सेलिब्रिटींच्या उपस्थितीला अवास्तव महत्त्व दिले जाते. प्रसिद्धी मिळविण्याच्या या स्पर्धेतून मंडळांमध्ये मतभेद निर्माण होऊ नयेत. गणरायाच्या उत्सवातून समाजात एकोपा वाढला पाहिजे; तेढ निर्माण होता कामा नये.

गणेशोत्सव हा समाजाला जोडणारा उत्सव आहे. त्यामुळे या दहा दिवसांत गणेश मंडळांनी समाजोपयोगी आणि विधायक उपक्रमांना प्राधान्य दिले पाहिजे. रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण, प्लास्टिकमुक्ती अभियान, वाहतूक जनजागृती, व्यसनमुक्ती जनजागृती, महिला आणि बालसुरक्षेविषयी प्रबोधन अशा अनेक उपक्रमांचे आयोजन करता येऊ शकते. आपल्या समाजात आजही अनेक कुटुंबे आर्थिक अडचणींचा सामना करीत आहेत. अनेक विद्यार्थी आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहतात. अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, पुस्तके, वह्या, शिष्यवृत्ती किंवा इतर आवश्यक मदत देण्याचा उपक्रम गणेश मंडळे राबवू शकतात. गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी घेणे, त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला हातभार लावणे, हा गणरायाला वाहिलेला खरा नैवेद्य ठरेल. पूर, दुष्काळ, अतिवृष्टी किंवा इतर नैसर्गिक आपत्तीच्या काळात गणेश मंडळांनी मदतीसाठी पुढे यावे. गरजू कुटुंबांना अन्नधान्य, कपडे आणि आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे, आपत्तीग्रस्तांना आर्थिक मदत करणे, हा सामाजिक बांधिलकीचा उत्तम आदर्श ठरू शकतो. अनाथाश्रम, वृद्धाश्रम आणि गरजू व्यक्तींना मदत करून गणेशोत्सवाला माणुसकीची जोड देता येईल. गणेश मंडळांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन करावे. गीतगायन, वक्तृत्व, निबंधलेखन, चित्रकला, हस्ताक्षर, प्रश्नमंजुषा, विज्ञान प्रदर्शन, कथाकथन अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला व्यासपीठ मिळू शकते. गणेश ही बुद्धीची आणि ज्ञानाची देवता मानली जाते. त्यामुळे गणेशोत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, वैज्ञानिक दृष्टिकोन वाढविणे आणि ज्ञानाची गोडी निर्माण करणे हे अत्यंत विधायक कार्य ठरू शकते. गणेशोत्सवाच्या काळात समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याची संधीही मिळते. जात, धर्म, भाषा, आर्थिक परिस्थिती यांचे भेद बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र येऊन उत्सव साजरा केला पाहिजे. समाजात बंधुभाव, सहकार्य आणि परस्पर सन्मान वाढविणे हीच सार्वजनिक गणेशोत्सवाची खरी ताकद आहे.

लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवामागे केवळ धार्मिक भावना नव्हती, तर समाजजागृती आणि संघटनशक्ती निर्माण करण्याचा व्यापक विचार होता. आज स्वातंत्र्य मिळून अनेक दशके झाली असली तरी समाजासमोर अनेक नवीन आव्हाने आहेत. अज्ञान, बेरोजगारी, व्यसनाधीनता, पर्यावरणाचा ऱ्हास, सामाजिक विषमता, डिजिटल गैरवापर आणि वाढते प्रदूषण यांसारख्या प्रश्नांवर जनजागृती करण्यासाठी गणेश मंडळे प्रभावी माध्यम बनू शकतात.

गणरायाच्या चरणी प्रार्थना करताना समाजासाठी आपण काय करू शकतो, याचाही विचार केला पाहिजे. गणेशोत्सवातील खर्चाचा काही भाग विधायक कामांसाठी राखून ठेवला, तर त्यातून अनेक गरजूंच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणता येईल. उत्सव संपल्यानंतर मंडप आणि सजावट हटविली जाते; परंतु त्या दहा दिवसांत केलेले समाजोपयोगी कार्य लोकांच्या मनात दीर्घकाळ टिकते. गणेशोत्सव हा आनंदाचा, भक्तीचा आणि उत्साहाचा उत्सव आहे. तो उत्साह निश्चितच कायम राहिला पाहिजे; मात्र त्याला शिस्त, संस्कार, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरणाची जोड मिळाली पाहिजे. दुसऱ्यांना त्रास न देता, पर्यावरणाचे रक्षण करत, कायद्याचे पालन करत आणि समाजाच्या हितासाठी विधायक उपक्रम राबवत गणेशोत्सव साजरा केला तर त्याचे पावित्र्य निश्चितच टिकून राहील.

मोठ्या मूर्तीपेक्षा मोठी भक्ती, मोठ्या आवाजापेक्षा मोठा सामाजिक संदेश आणि भव्य सजावटीपेक्षा मोठे समाजकार्य महत्त्वाचे आहे. लोकमान्य टिळकांनी दाखवून दिलेल्या मार्गावर चालत गणेशोत्सवाला पुन्हा सामाजिक प्रबोधनाचे आणि समाजसेवेचे स्वरूप देणे हीच गणरायाला खरी मानवंदना ठरेल. गणपती बाप्पा मोरया म्हणताना प्रत्येकाच्या मनात एकच संकल्प असावा'गणेशोत्सव भक्तीचा असावा, पर्यावरणपूरक असावा आणि समाजासाठी विधायक कार्य करणारा असावा.' अशा उत्सवातूनच गणरायाचे आगमन खऱ्या अर्थाने मंगलमय होईल आणि लोकमान्य टिळकांचा सार्वजनिक गणेशोत्सवामागील मूळ उद्देशही सार्थकी लागेल.



**श्याम ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**

# जालना जिल्ह्यात १ हजार १६ कुणबी जात वैधता प्रमाणपत्र वाटप

## जिल्ह्यात आजपासून ६२ विशेष शिबिरांचे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीची स्थापना झाल्यापासून जालना जिल्ह्यात आतापर्यंत १०१६ कुणबी जात वैधता प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले आहे. तसेच कुणबी जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महसूल विभागाच्या वतीने जालना जिल्ह्यात १० ते १७ सप्टेंबर, २०२६ या कालावधीत मंडळनिहाय विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. जालना जिल्ह्यात आढळून आलेल्या कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा अशा एकूण ५ हजार २७ नोंदी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर तसेच ग्रामपंचायतीमध्ये प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. कुणबी जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा प्रशासन गतीमान पद्धतीने काम करत असून उद्यापासून होणाऱ्या शिबिरात जास्तीत जास्त पात्र नागरिकांनी उपस्थित राहून प्रमाणपत्राची प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

जिल्ह्यातील पात्र नागरिकांना कुणबी जात प्रमाणपत्र तसेच जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यास येणाऱ्या अडचणींचे निराकरण करून ही प्रक्रिया गतिमान व पारदर्शक करण्यासाठी जालना जिल्ह्यात उपजिल्हाधिकारी (निवडणूक शाखा) शिरीष यादव यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. कुणबी जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महसूल विभागाच्या वतीने जालना जिल्ह्यात १० ते १७ सप्टेंबर, २०२६ या कालावधीत मंडळनिहाय विशेष शिबिरे होणार आहेत. जिल्ह्यातील आठही तालुक्यांमध्ये एकूण ६२ शिबिरांचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये जालना तालुक्यात १० शिबिर तर बदनापूर मध्ये ६, अंबड मध्ये ९, घनसावंगीमध्ये ८, परतूर मध्ये ६, मंठा मध्ये ६, भोकरदन मध्ये ११ आणि जाफराबाद मध्ये ६ असे एकूण ६२ शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील ८ तालुक्यांमधील ६२ महसूल मंडळांमध्ये दि.१०, ११, १२, १५ व १६ सप्टेंबर २०२६ रोजी या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

कुणबी जात प्रमाणपत्रासाठी नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात अर्ज प्राप्त होत असून, त्यांची छाननी, कागदपत्रांची पडताळणी तसेच उपलब्ध अभिलेखांच्या आधारे आवश्यक कार्यवाही करण्याचे काम महसूल विभागांकडून सुरू आहे. नागरिकांची गैरसोय होऊ नये आणि प्रमाणपत्र वितरणाची प्रक्रिया अधिक सुलभ व जलद व्हावी, तसेच पात्र नागरिकांना आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून जात प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी रात्रंदिवस कार्यरत आहेत.

न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीची स्थापना झाल्यापासून जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे आजपर्यंत वैधतेसाठी एकूण १६६४ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी १०१६ कुणबी जात वैधता प्रमाणपत्र म्हणजे एकूण प्राप्त अर्जाच्या तुलनेत ९८.६२ टक्के प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासनाने आजपासून आयोजित केलेल्या शिबिराच्या माध्यमातून पात्र अर्जदारांनी आपली वैध कागदपत्रे सादर करुन जात प्रमाणपत्र तसेच जात पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावीत. याबाबत कोणत्याही प्रकारची अडचण असल्यास हेल्पलाईन क्रमांक ०२४८२-२२३१३२ यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. कुणबी जात प्रमाणपत्राच्या प्रक्रियेत नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे. विशेष शिबिरांमध्ये दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# स्वामी प्रियाशरणजी महाराज यांच्या सानिध्यात जालन्यात नंदोत्सव साजरा

### नंद घर आनंद भयो, जय कन्हैया लाल की च्या जयघोषाने परिसर दुमदुमला

**जालना - प्रतिनिधी**

अखिल भारतीय अग्रवाल महासभा आणि राधा गोविंद सेवा मिशन छत्रपती संभाजीनगर संयुक्त विद्यमाने येथील छत्रपती शिवाजी पुतळा परिसरातील रूपम हॉलमध्ये परम श्रद्धेय स्वामी श्री प्रियाशरणजी महाराज यांच्या पावन सानिध्यात नंदोत्सव अत्यंत भक्तीभावाने व उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात शहर व परिसरातील सुमारे ६०० भाविकांनी सहभाग नोंदविला.

या नंदोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे बालकांसाठी बालकृष्ण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी आपल्या घरून बालकृष्ण साजशृंगार करून आणले होते. बालकृष्णाला आकर्षक झुल्यांमध्ये व सिंहासनावर सजवण्यात आले. एकूण १२१ महिला भाविकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला. होती. यावेळी बालकृष्णाला विविध पक्वान्नांचा ५६ भोग अर्पण करण्यात आला. नंद घर आनंद भयो, जय कन्हैया लाल की आणि राधे-राधेच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता.



***उत्कृष्ट सजावटीसाठी पारितोषिक* :** उत्कृष्ट व नयनरम्य शृंगार करून बालकृष्ण आणलेल्या १५ विशेष विजेत्यांची निवड करून त्यांना आकर्षक भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. तसेच महोत्सवात सहभागी झालेल्या उर्वरित सर्व भाविकांनाही प्रोत्साहनपर भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी अखिल भारतीय अग्रवाल महासभाव्या महाराष्ट्र महिला अध्यक्षा सीमा पंच, अनिता पित्ती (पान २ वर)

# मराठवाड्यात ३ लाख १६ हजारांहून अधिक कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप

### *जात पडताळणीची १६ हजारांहून अधिक प्रकरणे निकाली

### *शासनाच्या सकारात्मक कार्यवाहीची उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडून माहिती

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

मराठवाड्यात कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा प्रमाणपत्रांच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी शासनाकडून सातत्याने कार्यवाही करण्यात येत असून, आतापर्यंत प्राप्त झालेल्या ३ लाख १७ हजार ५६९ अर्जांपैकी ३ लाख १६ हजार ९७७ नागरिकांना कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. तसेच जात पडताळणीसाठी प्राप्त २१ हजार ५१ अर्जांपैकी १६ हजार ११० प्रकरणांमध्ये जात पडताळणी प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. शासनाची कार्यवाही पारदर्शक असून, मराठा समाजाला कायदेशीर व टिकणारे आरक्षण देण्याची शासनाची सकारात्मक भूमिका असल्याची माहिती मराठी भाषा व उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी आज स्मार्ट सिटी कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधताना दिली. यावेळी आमदार प्रसाद लाड उपस्थित होते.

शिंदे समिती स्थापन झाल्यानंतर मराठवाड्यात करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती देताना मंत्री डॉ. सामंत म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर आणि धाराशिव या आठ जिल्ह्यांमध्ये कुणबी प्रमाणपत्राच्या प्रक्रियेला गती देण्यात आली आहे. एकूण ३,१७,५६९ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ३,१६,९७७ प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली आहेत. याशिवाय २,९५,३०५ प्रमाणपत्रे १० टक्के आरक्षणाच्या अनुषंगाने देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

जात पडताळणी प्रक्रियेबाबत माहिती देताना मंत्री डॉ. सामंत यांनी सांगितले की, मराठवाड्यात २१,०५१ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी १६,११० प्रकरणे निकाली काढून प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत. या प्रक्रियेत केवळ ६४ प्रकरणे नामंजूर झाली असून, ही संख्या एकूण अर्जांच्या तुलनेत सुमारे ०.३ टक्के आहे. उर्वरित प्रकरणांवरही नियमानुसार कार्यवाही सुरू असून, नागरिकांना आवश्यक त्या प्रमाणपत्रांची पूर्तता करून देण्यासाठी प्रशासनाला निर्देश देण्यात आले आहेत.

शासनाने उपलब्ध करून दिलेल्या जुन्या अभिलेखांच्या माध्यमातूनही नागरिकांना मोठ्या प्रमाणात सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. आतापर्यंत शोधण्यात आलेल्या ५७ लाख नोंदी जनतेला पाहता याव्यात यासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ग्रामपंचायत स्तरापर्यंत ही माहिती पोहोचविण्यासाठी तसेच नागरिकांना आवश्यक माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी १० ते १७ सप्टेंबरदरम्यान विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

न्यायमूर्ती शिंदे समितीचा मराठवाडा दौरा ७ सप्टेंबरपासून सुरू झाला असून, या अनुषंगाने विभागातील प्रशासनाशी समन्वय साधून कार्यवाहीचा आढावा घेण्यात येत आहे. आजच्या बैठकीत उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी तसेच जात पडताळणी समितीचे प्रमुख अधिकारी सहभागी झाले होते. स्थानिक पातळीवरील कार्यवाही अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी वरिष्ठ अधिकारी आणि जिल्हा प्रशासन यांच्यात समन्वय साधण्यात आला.

हैदराबाद गॅझेटियरच्या अनुषंगाने प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही (पान २ वर)

# रेशीम शेतीतून शाश्वत उत्पन्नाचा मार्ग; शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन

### अकोला निकळक येथे 'मेरा रेशम मेरा अभिमान २.०' अभियानांतर्गत शास्त्रज्ञशेतकरी संवाद

**जालना - प्रतिनिधी**

मेरा रेशम मेरा अभिमान २.०' ( २.० ) अभियानांतर्गत बदनापूर तालुक्यातील अकोला निकळक येथे शास्त्रज्ञशेतकरी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांना शास्त्रीय पद्धतीने तुती लागवड, तुती बागेचे व्यवस्थापन आणि रेशीम कीटक संगोपनाबाबत सविस्तर तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले.




केंद्रीय रेशीम मंडळाच्या संशोधन विस्तार केंद्र, औरंगाबाद येथील शास्त्रज्ञ-ब अंकुश एस. गाडगे तसेच जिल्हा रेशीम विकास अधिकारी, जालना अजय पी. मोहिते यांनी उपस्थित शेतकऱ्यांना रेशीम शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान, तुती बागेची निगा, कीटक संगोपनाच्या शास्त्रीय पद्धती याबाबत मार्गदर्शन केले. तसेच रेशीम उद्योगाच्या विकासासाठी शासनामार्फत उपलब्ध असलेल्या विविध आर्थिक सहाय्य योजना व सुविधांची माहिती देण्यात आली.

यावेळी ग्लोबल विकास ट्रस्टचे प्रतिनिधी पवन परतूरकर यांनी नवीन शेतकऱ्यांना रेशीम शेतीकडे वळण्यासाठी संस्थेमार्फत उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या आर्थिक व तांत्रिक सहाय्याची माहिती दिली.

रेशीम शेतीमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत प्रति बॅच एक लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न (पान २ वर)

### जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशांनुसार जालना महसूल पथकाची कारवाई

# गोलापांगरी येथे २५ ब्रास बेकायदेशीर वाळू साठा जप्त

**जालना - प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीला आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी जालना व पोलीस अधिक्षक जालना यांच्या समन्वयाने महसूल व पोलीस प्रशासनाने अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी विशेष धडक मोहीम सुरु केली आहे. या मोहिमेअंतर्गत जिल्हाधिकारी जालना व पोलीस अधिक्षक जालना यांचे मार्गदशनाखाली राजू निहाळ नायब तहसिलदार व इतर कर्मचारी तसेच पोलीस निरिक्षक श्री. खामगळ, यांच्या संयुक्त पथकाने दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास गोलापांगरी परिसरात अचानक पाहणी व तपासणी मोहीम राबवली. या तपासणीदरम्यान मौजे गोलापांगरी येथे अंदाजे २५ ब्रासचा मोठा अवैध वाळू साठा आढळून आला. महसूल पथकाने तांतडीने कारवाई करत हा संपूर्ण वाळू साठा जप्त केला आहे. जप्त केलेला वाळू साठा पुढील योग्य व्यवस्थेसाठी आणि संरक्षणासाठी संबंधित सजाच्या तलाठ्यांच्या ताब्यात देण्यात आला आहे. अवैध वाळू साठा करणाऱ्या व उत्खननात सहभागी असलेल्या संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया महसूल विभागाकडून सुरू आहे. जिल्ह्यात यापुढेही अशा प्रकारे बेकायदेशीर वाळू उत्खनन किंवा वाहतूक आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनातर्फे देण्यात आला आहे.

# परतूरमध्ये शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)चा दहीहंडी महोत्सव उत्साहात संपन्न

**परतूर - प्रतिनिधी**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेला दहीहंडी महोत्सव २०२६ रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी परतूर शहरातील मार्केट कमिटी मैदानावर मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाला.



शिवसेना जिल्हाप्रमुख, मा. महेश भैय्या नळगे यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस, नितीन जेथलिया.परतुर नपचे गटनेते, गणेशनाना नळगे. बाबुराव हिवाळे.यांची उपस्थिती होती .

यावेळी दहीहंडी फोडण्यासाठी विविध गोविंदा पथकांनी सहभाग घेतला. ढोल-ताशांचा गजर, गोविंदांचा उत्साह आणि उपस्थित नागरिकांच्या जल्लोषामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

या महोत्सवाचे विशेष आकर्षण ठरले ते प्रथम पारितोषिक तब्बल ५० हजार ९९९ रुपये. दमदार कामगिरी करणाऱ्या विजेत्या गोविंदा पथकाला हे पारितोषिक प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमास नगरसेवक राजेश खंडेलवाल, शाकेर खतिब, विसम सय्यद, दिपक कदम दिपक काळे, दत्ता पाटील सुरूंग ,राहुल कदम , मधुकर पाईकराव, विजय वाणी, अशोक तनपुरे,शाम बरकुले, संदिप जगताप, बबलुशेठ बंदुकवाले , नामदेव धुमाळ ,भाऊसाहेब मुके ,शुभम पडुळ, प्रताप देशमुख, शाम शिंदे, गजानन मस्के, संदिप पाचारे, रवि देशमुख , ज्ञानेश्वर केवारे, शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते तसेच परतूर शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयोजकांच्या वतीने उपस्थित मान्यवर व नागरिकांचे स्वागत करण्यात आले. शिवसेनेच्या वतीने आयोजित या दहीहंडी महोत्सवामुळे परतूर शहरात उत्साह, एकजूट आणि जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# परतूर विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या पीक नुकसानीचा प्रश्न नितिन जेथलिया यांनी शासनदरबारी मांडला

### *उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार व कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांची मुंबईत भेट घेऊन निवेदन; तात्काळ पंचनामे, पीकविमा नुकसानभरपाई व ४ ट्रिगर पुन्हा लागू करण्याची मागणी*

**मुंबई - प्रतिनिधी**

परतूर विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना पावसाच्या दीर्घ खंडामुळे भेडसावत असलेल्या गंभीर पीक नुकसानीचा प्रश्न शासनाच्या स्तरावर तातडीने मांडण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नितिन सुरेशकुमार जेथलिया यांनी मुंबई येथे राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई अजितदादा पवार तसेच कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. यावेळी नितिन जेथलिया यांनी परतूर विधानसभा मतदारसंघातील परतूर, मंठा तसेच ग्रामीण भागातील सद्यस्थितीची संपूर्ण माहिती उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार व कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांना दिली.यावेळी माजी मंत्री संजय बनसोडे, मा.आ.विक्रमबप्पा काळे हे देखील उपस्तिथ होते.यंदा अत्यल्प पाऊस तसेच मागील एक महिन्यापेक्षा अधिक काळ पडलेल्या पावसाच्या दीर्घ खंडामुळे कापूस, सोयाबीन व इतर खरीप पिके मोठ्या प्रमाणावर बाधित झाली असून अनेक ठिकाणी पिके करपण्याच्या अवस्थेत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास वाचविण्याची मागणी



शेतकऱ्यांनी बी-बियाणे, खते, औषधे, मशागत, मजुरी व डिझेलसाठी मोठ्या प्रमाणात खर्च केला आहे. मात्र पिकांच्या महत्त्वाच्या वाढीच्या व उत्पादनाच्या काळात पावसाने मोठी दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे या परिस्थितीची तातडीने दखल घेऊन शासनाने शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी जेथलिया यांनी केली. तात्काळ पंचनामे करून पीकविमा व नुकसानभरपाई द्या परतूर विधानसभा मतदारसंघातील नुकसानग्रस्त गावांमध्ये महसूल व कृषी विभागाच्या संयुक्त पथकांमार्फत तात्काळ गावनिहाय व शेतनिहाय पाहणी करून पंचनामे करण्यात यावेत, अशी प्रमुख मागणी निवेदनातून करण्यात आली.

तसेच ज्या शेतकऱ्यांनी पीकविमा भरलेला आहे, त्यांना नियमानुसार पीकविमा नुकसानभरपाई मिळण्यासाठी संबंधित यंत्रणेला तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली.

**पूर्वीचे ०४ ट्रिगर पुन्हा लागू करण्याची मागणी**

पीकविमा योजनेअंतर्गत पूर्वी अस्तित्वात असलेले ०४ ट्रिगर पुन्हा लागू करून पात्र शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळवून द्यावा, अशी महत्त्वाची मागणीही नितिन जेथलिया यांनी कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांच्याकडे केली. तसेच शासनाच्या निकषानुसार पात्र नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नैसर्गिक आपत्ती व पीक नुकसानभरपाई, पीकविमा लाभ, आवश्यक कर्जसवलत व कर्ज पुनर्गठनाचा लाभ मिळवून देण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली.

शासनाकडून सकारात्मक कार्यवाहीची अपेक्षा यावेळी नितिन जेथलिया यांनी परतूर विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या अडचणी, पावसातील दीर्घ खंडामुळे पिकांवर झालेला परिणाम, संभाव्य (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.